## पुस्तिका - पंधरा

**माहिती मिळण्याकरिता नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असल्यास ग्रंथालयाचा किंवा वाचनालयाचा तपशील.**

**कार्यालयीन ग्रंथालय** – फक्त नगरसेवक आणि महानगरपालिका अधिकारी हयांजकरिता एक स्वतंत्र ग्रंथालय हया कार्यालयातर्फे चालविण्यात येते. तथापि, जर कुठल्याही व्यक्तीने नगरसेवकांचे ग्रंथालय संदर्भित करण्याकरिता अर्ज केल्यास त्याला महानगरपालिकेतर्फे कार्यालयीन वेळेत (सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.३०) परवानगी देण्यात येते.

**हया कार्यालयातील अभिलेखांची पाहणी करणे :-** महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभांचे वृत्तांत हया कार्यालयातर्फे परिरक्षित केले जातात. सदर सभावृत्तांत महानगरपालिका सचिवांच्या कार्यालयात पालिका सदस्यांसाठी विनामूल्य व इतर कोणत्याही व्यक्तीसाठी तिने ५० नवे पैसे इतकी किंवा महानगरपालिका निश्चित करील अशी, दोन रुपयांहून अधिक नसेल इतकी फी ची रक्कम दिल्यानंतर किंवा माहिती अधिकाराच्या परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या शुल्कानुसार पाहणीसाठी उपलब्ध असतील.

**कागदपत्रांच्या प्रती देण्याबाबतची पध्दत :-** महानगरपालिका आणि तिच्या विविध समित्यांच्या सभांच्या वृत्तांतातील उतारे, हया खात्याने विहित केलेल्या शुल्काचे अधिदान केल्यानंतर सर्वसाधारण जनतेला उपलब्ध करुन देण्यात येतात.

**सार्वजनिक प्राधिकरणाची वेबसाईट :-** हया खात्याची सर्व माहिती **Portal.mcgm.gov.in** हया वेबसाईटवर उपलब्ध आहे.

---

**ही माहिती वेळोवेळी बदल होण्यासापेक्ष आहे.**